# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक ११ | मुंबई | मे २०१४ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## ‘बसंतकी बहार’

**—सुहासिनी कीर्तिकर**

आज सकाळी घरी परतत असताना दिसले एक दृश्य. दृश्य तसे नेहमीचेच. महानगर पालिकेच्या कचरागाड्या उभ्या रस्त्यात. कचऱ्याचे मोठमोठे डबे त्यात रिचवले जाताहेत. अजूनही एखादी सेविका मोठ्या बांबूच्या झाडूने रस्ता ‘लोटते’ आहे. पण या नेहमीच्या दृश्यात त्यादिवशी मला वेगळे काय वाटले बरे? हां! झाडूने कचरा गोळा केला जात होता. अगदी पिवळाधम्मक. अमलताशचा (की बहावाचा?) सडा होता तो. रहदारी धकाधकीची. धूळ भरलेली. वायू प्रदूषण करणारी. अवतीभवती माणसांची घड्याळाबरहुकूम सतत धावपळ. पण याच धावपळीत एक पळभर थांबावेसे वाटते ते या रस्त्यावरच्या पिवळ्यापिवळ्या मखमालीचा स्पर्श डोळ्यांना सोने लुटायला देणाऱ्या, खच पडलेल्या फुलांकडे बघून. मग मनात महक पसरतो तो वसंतऋतुचा. काळे मुर्दाड रस्ते, पेव्हर ब्लॉक्स उखडलेले फूटपाथ, बाजारीकरण दाखवणारे विविध ‘फ्लेक्स’, फूटपाथवरच ‘दुर्वा’च्या नावाखाली बरेचसे गवत आणि फुलांच्या नावाखाली बिनवासाची स्वस्तिकाचीच फुलं अधिक देऊन ‘धंदा’ करणारे फुलपुडीवाले, प्लास्टिकच्या पिशव्यातून दूध देणाऱ्या रस्त्यावरच असलेल्या क्रेटस्, रस्त्यावरचेच अन्न ‘पूर्णब्रह्म’ मानून खादाडी करणाऱ्या ग्राहकांसाठी ‘नाश्ता’ देणारे दुकानदार... यात रोजच ‘तेच ते नि तेच ते!’ काय त्यात सौंदर्य? काय त्यात दिलखेचक? पण जादुईभरल्या वसंतात या सगळ्या रूक्ष तपशीलात रंग भरतो तो ‘फुली फुलून’ येणाऱ्या ‘बसंती’ झाडांमुळे. अख्खा रस्ता नुसता मखमली पिवळाधम्म होत जातो.

वसंताचा हा करिष्मा! याच पिवळ्या गालिच्याशेजारी एखादा ‘वेडा’ गुलमोहर असेल तर रस्त्यावर हळदीकुंकवाचे शकुनसडे घातले जातात. एरवीही गुलमोहर आपल्या इवल्या इवल्या पानांनी अवघ्या आकाशावर नक्षी रेखत असतोच. ही पाने हवेत अलगद तरंगल्यासारखीच हलत असतात. शेवग्याची पानेही तशीच म्हणा. पण ऋतुमती झाल्यावर पांढऱ्या कुसमूर इवल्या इवल्या फुलांच्या चांदण्या ही पाने दिमाखाने वागवतात. हं! तर वसंताचे रुपडे पहाणे चाललेय् आता. गुलमोहोराच्या लालिम्यापेक्षा अधिक अंगार फुलवणारा लाल पळस याच वसंताला तारुण्याची मस्ती बहाल करतो.. पळसाचे संस्कृत नाव किंशुक. म्हणजे ‘अरे हा पोपट?’ (किम् शुक:?) असा भास निर्माण करणारा फुलाचा आकार. पोपटाच्या बाकदार चोचीसारखी एक दळदार पाकळी वळलेली. बाकीच्या त्या पाकळीला तोलून धरणारा खळगा करून पुढे झुकलेल्या. ‘दिवस तुझे हे फुलायचे, झोपाळ्यावाचून झुलायचे’ अशा तारुण्याच्या काळात फुललेला पळस म्हणजे उत्साह तटतटून उसळणारी उर्मीच. अवघे रान पेटून उठावे तसे हे पळसाचे पलिते तारुण्याला पालवत राहतात. हा सारा वसंताचा महिमा. गंमत म्हणजे अशावेळी बेहिशोबी फुलताना वस्त्रे उतरावीत तशी सर्वच्या सर्व पाने झाड सोडून मातीत उतरतात. झाड उघडेबोडके होऊन स्तब्धपणे वाट पाहात राहते. चाहूल घेत राहते वसंताची. मग हां हां म्हणता ‘चाफा फुली फुलून’ येतो. खुडचाफा वा देवचाफा असाच ना. पाने गाळून फांद्याफांद्यानी बहराचे अदृष्ट आता येईल, मग येईल करत ‘बोकेसंन्याशी’ होतो. अन् मग फुलाफुलांनी लगडून जातो. आमच्या दक्षिण मुंबईत एखादाच एकाण्डा ‘जॅकरांडा’ झावबा राम मंदिराच्या दारात फूटपाथवर पहारा करतो. त्यामुळे त्याचे ‘बसंती’ रूप इथे तेव्हडे नजरेचा वेध घेत नाही. पण दूर उपनगरात वसलेल्या वसाहतींना

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## घास रे रामा...

**—मिनाक्षी जयकर**

नेहमीप्रमाणे सकाळी ‘ती’ची ऑफिसला जायची धांदल चालली होती; पटापट सर्व कामं उरकत होती. ‘ति’चा नवरा तर कधीच कामासाठी निघून गेला होता. ‘ती’ एकीकडे मुलांना शाळेसाठी तयार करताना स्वत:चीही तयारी करीत होती. चपात्या करणारी बाई येऊन चपात्या करून गेली होती. पण केर-कचरा काढणाऱ्या बाईचा अजून पत्ता नव्हता. त्या बाईची नेहमीची यायची वेळ केव्हाच टळून गेली होती. केर-कचरा काढण्याबरोबरच कुठे भाजी चिरून दे, भाजी शिजवून दे यासारखी इतरही छोटी-मोठी कामे ती बाई करीत असे. ‘ति’च्या मनात शंकेची पाल चुकचुकली. इतक्यात ‘ति’चा फोन वाजला आणि त्या शंकेचं वास्तवात रूपांतर झालं. केर-कचरा व इतर बारीक-सारीक कामं करणाऱ्या बाईला अचानक ताप आल्यामुळे ती कामावर येऊ शकत नव्हती. झालं! ‘हि’चं सर्व वेळापत्रक कोलमडून पडलं. त्या बाईची सर्व नाही तरी; काही आवश्यक कामंतरी ‘हि’ला सकाळी ऑफिसला जाण्याआधीच करणं जरुरी होतं. म्हणजेच ऑफिसला जायला उशीर होणार, आणि ऑफिसला उशीर म्हणजे...!

खूप ओळखीची वाटते ना ही घटना! ही गोष्ट नवरा-बायको दोघंही नोकरी करणाऱ्या घरात कमी-अधिक फरकाने कधी ना कधी अनुभवास आलेली असते. आजच्या विभक्त कुटुंबपद्धतीत घराचं `routine' सुरळीत पार पाडण्यासाठी अशा घरगडी किंवा कामवाल्या बायांची नितांत आवश्यकता असते. घरगडी किंवा कामवाल्या बाया-अनेकवचनी, एकाच बाईवर किंवा गड्यावर अवलंबून राहवं लागू नये म्हणून प्रत्येक कामासाठी वेगळे गडी किंवा बाया. पण कधी कधी अशी गंमत होते की सगळेच काही ना काही कारणाने रजा घेतात. तब्येत बरी नाही, घरात कार्य आहे यासारख्या कारणांना आपण आक्षेप तरी कसा आणि काय घेणार? परिणाम ‘ति’च्या हाताशी एकही गडी किंवा बाई नसते. घरातल्या कामाचा डोंगर कधी एकटीने, कधी नवऱ्याच्या मदतीने उचलावा लागतो. म्हणजे, ‘घास रे रामा, भांड्यांची रास, तू घास’. इथे ‘रामा’ म्हणजे देवाला संबोधलेले आहे (हरे रामा!च्या धर्तीवर). आपल्याकडच्या पूर्वीच्या रामागड्याला नाही! खरंच, तो काळ किती सुखाचा होता! घरोघरी किमान एकतरी रामागडी असायचाच. कुठलंही छोटंमोठं काम करायला रामाला सांगा किंवा महादूला. गड्यांना तोटा नाही. पुन्हा सर्व एकदम रजेवर गेलेत असं होत नसे. बाकीचे सर्व गावाला गेले तरी एकजण इथे रहायचा. पण तेव्हाही घरातल्या ‘ति’ची थोडी पंचाईतच व्हायची. कारण तीन-चार गड्यांची सवय. तिथे सर्व कामे एकाकडूनच करवून घ्यायची म्हणजे थोडी पंचाईत होणारच. काळाबरोबर ‘ती’ची पिढी बदलली, यांत्रिक प्रगती झाली तरी ‘ति’चं गड्यांवर किंवा आता कामवाल्या बायांवर अवलंबून राहणं काही बदललं नाही. कपडे धुवायचं यंत्र, भांडी घासायलाही यंत्र, भाज्या कापायला यंत्र, कणीक मळायला यंत्र, चपात्या करायला यंत्र. अगदी पूर्वीच्या पाटा-वरवंट्याची जागाही आता यंत्रानेच घेतली आहे. काम करण्याकरता करावी लागणारी मेहनत कमी झाली तरी ती कामं करणारी यंत्रं चालविण्यासाठी ‘ति’ला गडी अथवा बायांवर अवलंबून रहावे लागते. आजच्या धकाधकीच्या जीवनात या बाया ‘ति’च्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनून जातात. मग एखाद दिवस यापैकी एक जरी आला/ आली नाही तर ‘ति’चं संपूर्ण दिवसाचं वेळापत्रक कोलमडून न पडलं तरच नवल!

कधी कधी यातल्या काही बायकांशी ‘हि’ची आणि त्या

(पान २ कॉलम २ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

तोच जॅकरँडा आपली जांभळी झिलई देतो. ठाण्याला 'हिरानंदानी इस्टेट'चे रस्ते असेच जांभळ्या फुलांच्या चवऱ्यांनी 'बा-अदब' झुलतात. उंच इमारतीमधून पाहिलं तर दुसरं काही दिसतच नाही. फक्त जांभळ्या फुलांनी 'एककतार'मध्ये फुलून आलेले रस्त्याचे सुंदर वळण स्वप्ननगरीचा भास उभा करते. मनात उद्गार येतो, 'अरे! आला-वसंत आला!'

माझ्या घरच्या छोट्टयाशा बागेत पारिजातक आहे. आपल्या परभी बोलीत पारताक! 'एक्झोरा' आहे. वसंताची चाहूल घेता घेता ही झाडे पानन्पान ढाळतात. रुक्ष संन्यासी होतात. असं वाटतं की यांचा जीव जातोय की काय? पण प्रेमाचा उन्माद चढण्यापूर्वी खाणेपिणे नकोसेच वाटावे अशी ही अवस्था. मग हां हां म्हणता पाचूची पाने डहाळी डहाळीला इतकी श्रीमंत करतात की वाटते वसंताने यांच्या डहाळ्यांच्या बासरीत फुंकर मारली आहे. मग या पानांना मढविण्यासाठी-सजविण्यासाठी येतात सुकुमार कळ्या. या कळ्यांची फुले मनामध्ये दरवळत राहतात. वसंताचाच हा खट्याळपणा ना? 'ये वसंत रानीवनी, हासली लताफुले'... रानावनात तर येतोच वसंत. पण रुक्ष शहरातही तो असा रस्ते, घरआंगण सुशोभित करतो. इंदिरा संतांनी तर स्त्रीसुलभ शृंगार-, हवेसे वाटणारे नटणथटणे ऋतुमधूनच खेळवले आहे. त्या म्हणतात, 'वसंतातले फुलाफुलांचे छापील उंची पातळ ल्यावे' क्या बात है! वसंतातल्या फुलांचे 'प्रिंटेड' पातळ? बरोबर आहे. ते 'उंची पातळ' दुसऱ्या कोठल्या कारखान्यात तयार होणार म्हणा! 'बसंतकी बहार' अशी रोजच्या जगण्यातून जाणवते.

त्यामुळेच तर आपले रोजचे 'माकडछाप' जगणे रंगीबेरंगी, उत्फुल्ल होऊन जाते. सर्व इंद्रियांना सुख देणाऱ्या या वसंताच्या फुलपरडीचा सुगंध तर विचारूच नका. मोगरा, अनंत, जाई, जुई, मदनबाण या दुधाळ पांढऱ्या फुलांचे रूप सोज्ज्वळ. पण वास वसंतातलाच; उत्तेजक. चित्तवृत्ती-मध्ये अनावरपण भरणारा. असे उत्तेजक अनावरपण आंब्याच्या मोहोरामध्येही आहे. म्हणून तर याच ऋतूत आंब्यावर बसून कोकीळ साद घालीत राहतो. 'अंबूवाकी डालीपर कोयल बोले!' आंब्याचा मोहोर हा कामदेवाच्या फुलांच्या बाणातील एक आहे. 'अरविंदम् अशोकम् च च्यूतम् च नवमल्लिका' आणि 'नीलोत्पलम्' असे त्याचे पाच फुलांचे बाण. म्हणून तो 'पञ्चबाण सयावक'! 'च्यूतम्' म्हणजे आंब्याचा मोहोर. चित्तवृत्ती मोहरून टाकणारा तो सुगंध. रक्तात उतरणारी ती मादकता. हे सारे वसंताचे खेळ बरे.

फळाफुलांच्या, कुठल्याही झाडाकडे जा. वसंताने त्यावर आपली जादुई काठी फिरवलेली असते. मग माणसंही त्याचा उपभोग घेण्यासाठी सज्ज होतात. चैत्रातले हळदीकुंकू, चैत्रगौर... सारे सजते. कारण? कारण अवघा निसर्गच वसंतऋतूमध्ये रंगगंधस्पर्शानं चैत्रगौर झालेला असतो.

म्हणूनच वाटते की अशावेळी या फुलांच्या सड्याला कचरा म्हणून मनातून फक्त 'लोटून' देऊ नका. त्याचा सर्वेंद्रियांनी 'लोटपोट' होत आस्वाद घ्या. मनापासून म्हणा की माणसाच्या आयुष्यातही असा वसंत फुलू द्या.

तर मित्रहो, वसंतकाले शुभम् भवतु!'

⁕

# पाठारे प्रभु सोशल समाजाचा फोटो-मेनिया

सोशल समाजाच्या इतिहासात किंबहुना पाठारे प्रभु ज्ञातीच्या इतिहासात प्रथमच आयोजित करण्यात आलेले पाठारे प्रभु ज्ञाती बांधवांचे फोटोग्राफी प्रदर्शन व कॉम्पिटिशन हा उपक्रम, सहभागी फोटोग्राफर्सच्या आणि प्रेक्षकांच्या प्रचंड उपस्थितीत रविवार, दिनांक २७ एप्रिल, २०१४ रोजी खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्रात उत्साहात साजरा झाला.

प्रदर्शनाचे परीक्षक होते श्री. मिथील मोमय्या. वाईल्ड लाईफ फोटोग्राफीच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केलेल्या आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पुरस्कार प्राप्त केलेल्या श्री. मोमय्या यांनी सकाळी साडेदहा वाजता फीत कापून प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले आणि तब्बल एक तास या प्रदर्शनात मांडलेल्या छायाचित्रांचे बारकाईने परीक्षण केले. या प्रदर्शनात एकूण २० फोटोग्राफर्सनी आपली कला सादर केली होती आणि फेसबुक कॉंटेस्टमधून सर्वाधिक लाईक्स मिळालेल्या ५ छायाचित्रकारांचे फोटोही सादर केलेले होते. दोन्ही गटांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक विजेत्यांची परीक्षकांनी निवड केल्यानंतर प्रदर्शन प्रेक्षकांसाठी खुले करण्यात आले. सोशल समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर यांनी उपस्थितांना श्री. मोमय्या यांचा परिचय करून दिला आणि समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती प्र. राणे यांनी त्यांना पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सन्मानित केले. आपल्या परीक्षणाचा निकष सांगताना श्री. मोमय्या यांनी आपल्या भाषणात फोटोग्राफर्सना फार मोलाचा सल्ला दिला. 'आपले जे जे उत्तम आहे, तेव्हढेच फक्त स्पर्धेत प्रेझेंट करा. त्यासाठी आत्मपरीक्षण करून आपल्या कलेचे 'एडिटिंग' करा' असे त्यांनी सांगितले. स्पर्धेत पारितोषिक विजेते ठरले- (१) कॅ. आश्विन हेमचंद्र प्रधान, (२) श्री. हर्षुल नंदकुमार नायक आणि (३) श्री. राहुल किरण आगासकर, तर फेसबुक कॉंटेस्टच्या विजेत्या होत्या तीनही महिला- (१) संजीवनी राणे (परब), (२) मोनिका राणे (अय्यर) आणि (३) त्वरिता संजय दळवी.

हे प्रदर्शन सोशल समाजाने श्री. सुनील धैर्यवान यांचे सुपुत्र व कु. वृषाली धैर्यवान यांचे बंधु कै. श्री. धवल धैर्यवान यांच्या स्मृतीस समर्पित केले होते. श्री. धवल यांचेही फोटोग्राफ्स प्रदर्शनात प्रेक्षकांना पाहण्यासाठी प्रदर्शित करण्यात आले होते. श्री. सुनील धैर्यवान यांनी स्पर्धेच्या बक्षिसांसाठी सोशल समाजाला भरीव देणगी देऊन आपल्या दिवंगत पुत्राच्या स्मृतीस अभिवादन केले.

पारितोषिक वितरणासाठी प्रमुख पाहुणे होते श्री. अंबर महादेव कोठारे. त्यांचे सुपुत्र श्री. महेश कोठारे यांच्यासमवेत ते सायंकाळी आले. त्यांनी आधी प्रदर्शनातील फोटोग्राफी कलेचे निरीक्षण करून फोटोग्राफर्ससोबत चर्चाही केली. प्रदर्शनाचा एकूण थाट पाहून 'एखाद्या आर्ट गॅलरीत आल्यासारखेच वाटले', असे मत त्यांनी प्रदर्शित केले. त्यानंतर समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि मिठाई व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे व श्री. महेश यांचेही स्वागत केले. श्री. अंबर यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके आणि सर्वच सहभागी फोटोग्राफर्सना सोशल समाजातर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली. आपल्या छोटेखानी भाषणात श्री. अंबरनी हे प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल समाजाच्या कार्यकारिणीचे आणि सर्व पाठारे प्रभु फोटोग्राफर्सचे मन:पूर्वक कौतुक केले आणि 'आगे बढो' अशा शुभेच्छा दिल्या. श्री. महेश यांनीही सोशल समाज नवनवीन वाटा चोखाळत असल्याबद्दल समाजाचे अभिनंदन केले. प्रमुख पाहुणे श्री. अंबरनी याप्रसंगी समाजाला रु. ५०००ची देणगी दिली, तर श्री. नंदकुमार विजयकरांनी रु. १००१ देणगीदाखल दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. नीता सेंजित यांनी केले. श्री. जयंत कीर्तिकर यांनी आभार मानले.

हा सर्व समारंभ इतक्या नीटसपणे, अगदी व्यावसायिक धर्तीवर आयोजित करण्यामागे समाजाच्या कार्यकारिणीवर नव्याने निवडून आलेल्या तरुण सभासदांचे, म्हणजे श्री. निकोलाय कीर्तिकर, श्री. चारुदत्त धैर्यवान, श्री. राहुल आगासकर व श्री. अभिजीत विजयकर यांचे आणि समाजाचे सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकर व सौ. नीता सेंजित यांचे अथक परिश्रम, नियोजन आणि दूरदृष्टी होती. तसेच या प्रदर्शनासाठी ज्या देणगीदारांनी सढळ हस्ते आर्थिक मदत केली ते म्हणजे, श्री. सुनील धैर्यवान, ईश्वरी व विद्याधर ट्रस्टच्या विश्वस्त श्रीमती प्रमिला तळपदे, सौ. विजेता वाझकर, सौ. वैभवी वाझकर (राव) यांच्याकडून मिळालेले बॅनर्स, श्री मनोज नायक यांनी नातवाच्या स्मरणार्थ कायम स्वरूपी बॅनर असे बहुमोल सहकार्य झाले. खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या कार्यकारिणीने प्रदर्शनाच्या तयारीसाठी हॉल उपलब्ध करून देऊन जे सहकार्य दिले त्याबद्दल समाजाला कृतज्ञता आहे. सोशल समाजाच्या समितीवर नसतानाही ज्या इतर ज्ञातीबांधवांनी सहकार्य केले त्यांचा- म्हणजे श्री. किशोर जयकर, श्री. संदीप धुरंधर, श्री. पवन कीर्तिकर आणि श्री. हिरेन नायक यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

अशा प्रकारचे प्रदर्शन प्रथमच भरत असल्याने प्रेक्षकांच्या प्रतिसादाबद्दल अंदाज बांधता येत नव्हता. परंतु आपली ज्ञात किती हौशी व उत्साही आहे याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला आणि तुडुंब गर्दीत हा सोहळा संपन्न झाला. अभिप्रायपुस्तिकेत दिलेल्या अभिप्रायावरून हे प्रदर्शन व हा उपक्रम किती यशस्वी ठरला याची साक्ष पटते.

प्रदर्शनाला भेट देणाऱ्या प्रेक्षकांच्या सोयीसाठी चहा, कॉफी, खाद्यपदार्थ व इतर विविध वस्तूंचे स्टॉल्सही आयोजित करण्यात आले होते. त्यांना प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला.

सोशल समाज काळानुसार कात टाकतो आहे; याचे प्रत्यंतर या उपक्रमामुळे ज्ञातीयांना आले. समाजाचे अभिनंदन.

विस्तारीत संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

बायांची 'हि'च्याशी अशी काही तार जुळते की त्या घरातलीच एक व्यक्ती होऊन जातात. अर्थातच नेहमीच काही असं होत नाही. मानवी स्वभावाच्या मर्यादा इथेही लागू होतातच. पण जेव्हा-केव्हा ह्या तारा जुळतात तेव्हा 'हि'ला खूप रीलिफ मिळतो. अशाच तारा जुळलेली माझी बाई लेकीच्या बाळंतपणासाठी रजेवर गेली आहे. ती परत कधी कामावर येतेय याची मी अगदी आतुरतेने वाट बघतेय. ती कधी परत येते आणि मी 'हुश्य' करते! तोपर्यंत... 'घास रे रामा...!'

## प्रभुप्रभात

'प्रभुप्रभाता'चा वर्धापन दिन दिनांक १ मे, २०१४ रोजी मुंबई मराठी साहित्य संघ येथे सॉलि. श्री. मोहन मोतीराम जयकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. विविध गुणगौरवपर पारितोषिके याप्रसंगी देण्यात आली. 'बे दुणे पाच' या नाट्यप्रयोगाने समारंभाची सांगता झाली. गुणीजनांचा गौरव करणारा हा वर्धापन दिन असाच वर्षानुवर्षे साजरा होवो.

⁕

लेखांक ५

# माणूस म्हणून-

## प्रतिक्षा

-डॉ. सुमन नवलकर
(मोबाईल-९८६९०२८९६७)

''अमरची स्थिती अगदी गंभीर आहे वसुधा. खूपच गंभीर.'' वरुणच्या या सांगण्यावर वसुधा चकित होऊन पाहतच राहिली.

''गंभीर कशी काय रे? पाठदुखीच आहे त्याला फक्त. आणि 'भूक लागत नाही, जेवण जात नाही' म्हणाला. मी तर म्हटलंही त्याला की, 'पाठदुखीमुळे भूक लागत नाही, हे पहिल्यांदाच ऐकतेय'. त्यावर तो म्हणाला, 'मीपण हे पहिल्यांदाच ऐकतोय'. वर हसलाही. मात्र नेहमीपेक्षा आवाज आणि हसणं जरा क्षीण वाटलं. पण गालांना खळ्या तर पडल्याच असणार नेहमीसारख्या. तो मलूल वाटला, म्हणून मीही म्हटलं, ''ठेव फोन. पण आता हे गंभीर आजारपण ते कुठलं?''

''अगं, पाठदुखीसाठी आधी अस्थीशल्यविशारद झाला. मग भूक लागत नाही म्हणून सोनोग्राफी, गॅस्ट्रोस्कोपी असलं काय-काय झालं. शेवटी टी.बी. असावा समजून डॉक्टरांनी दोन महिने टी.बी.ची तगडी औषधं दिली. त्यामुळे लिव्हरवर परिणाम झालाय म्हणे. आता कोणा ऱ्हूमॅटॉलॉजिस्टची की कोणाची तरी अपॉईंटमेंट मिळाली म्हणून अनिता त्याला त्या झंगियानीच्या हॉस्पिटलात घेऊन गेली. त्यांनी सगळ्या तपासण्या करण्यासाठी त्याला भर्तीच करून घेतलं. तर आता तिथले डॉक्टर म्हणतायत की, पाठीच्या एका मणक्याला कसलातरी संसर्ग झाल्याने तो पसरट होऊन कण्याला स्पर्श करतोय, म्हणून पाठ दुखतेय. शिवाय ते म्हणतायत की दोन महिने टी.बी.ची भारी औषधं घेऊनही हा संसर्ग गेला नाही; त्यामुळे तो कसला एवढा संसर्ग आहे, तेही पाहावं लागेल.''

वसुधा रडवेलीच झाली. अमर तिचा सख्खा नसला तरी लाडका भाऊ. तिच्याच वयाचा आणि एकाच कॉलनीत लहानाचे मोठे झाले. त्यामुळे भावा-बहिणीच्या नात्याहूनही मोठं असं मैत्रीचं नातं. लग्न होऊन वसुधा सासरी गेली आणि अमरही जुनं घर विकून उपनगरात राहायला गेला. त्यामुळे रोजच्या गाठी-भेटी, गप्पा-गोष्टी थांबल्या. पण आठ-पंधरा दिवसांनी फोनवर बोलणं होतच राहिलं.

नुकतीच दोघांनीही साठी पार केली. तेव्हापासून 'काय म्हाताऱ्या?' आणि 'काय म्हातारे?' अशीच बोलण्याची सुरुवात असायची फोनवर. आणि आता ही बातमी. तेवढ्यात पार्थ ऑफिसमधून घरी आला. अमरमामाची तब्येत बरी नाही ऐकून म्हणाला, ''पाठीचे मणके शस्त्रक्रिया करून बदलतात हल्ली यशस्वीपणे. काळजी करू नकोस. चांगला बरा होईल अमरमामा.''

काळजीत असल्यावर कोणी दिलासा दिला की मनाला लगेच उभारी येते, तसं झालं. वसुधा निश्चिंत झाली. पण तसं होणं नव्हतं अमरच्या नशिबात. दुसऱ्याच दिवशी बातमी आली- 'कॅन्सर.' फुफ्फुस, लिव्हर सगळीकडे पसरलाय. एक-दोन दिवसात हॉस्पिटलमधून घरी आणणार. डॉक्टर म्हणतात, ''शेवटची 'स्टेज' आहे. घरी न्या आणि 'पेनकीलर'वर ठेवा.''

'फक्त काही दिवसांचा सोबती आहे' या डॉक्टरांच्या विधानाने अनिताबरोबर वसुधा, वरुण, पार्थ सगळेच हादरले. अनिताने दिल्लीहून यशला बोलावून घेतलं. यश तातडीने शलाका आणि शेफालीला घेऊनच आला.

'काऊंटडाऊन' सुरू झाला. बाबा काही दिवसाचे सोबती आहेत म्हटल्यावर यश राहिलाच मग. पण 'काही' म्हणजे नेमके 'किती' दिवस ते कसं समजणार? अमरचा आजार पराकोटीचाच. पेनकीलर घेऊनही दुखणं कमी होत नाही. द्रवपदार्थांवरच आहे. पण तेही जात नाहीयेत. ताकद दिवसेंदिवस कमी-कमी होत चाललीय. पण श्वास चालू आहेत.

म्हणता म्हणता आठवडा झाला. परिस्थिती तशीच. आवाज अधिक क्षीण. माणसं भेटायला येतात. अमरमध्ये बोलायची ताकद नाहीच. मानेने, डोळ्यांनी ओळखल्याचे दर्शवतो. दहा दिवस झाले. मधे यश दोन-चार दिवस दिल्लीलाही जाऊन आला. ऑफीसचं तातडीने करायचं काम उरकून आला. दोन आठवडे झाले. श्वास चालू आहे. अमर आहे अजून. दोन आठवडे झाले तरीही. शलाका पण रजा घेऊन आलीय. अनिताने तर कधीचंच ऑफिसला जाणे बंद केलंय. अमरची सेवा करतेय. पण यश मिळणार नाहीये हे ठाऊक आहे.

यश मिळण्याची शाश्वती असली, किंवा थोडी जरी यशस्वी होण्याची शक्यता असली, तरी सेवा करणाऱ्याला हुरूप असतो. पण डॉक्टरांनीच हात टेकलेले असले की आजारी माणसाचे नातलगही हात-पाय गाळून बसतात.

दूर तर दूर, पण वसुधा दोन-चार दिवसांनी एखादी फेरी मारायचीच. तासभर अमरच्या पलंगापाशी खुर्ची घेऊन बसायची. अमर मध्येच कधी डोळे उघडून पाहायचा. पण तेवढंच. बसलेल्या गालफडांमध्ये खळ्या हरपल्या होत्या. विनोद करत-करत बोलणारा तिचा लाडका भाऊ, तिचा जवळचा मित्र दूरच्या प्रवासाला जाण्यासाठी चंबू-गबाळं बांधून बसला होता. श्वास तेवढे चालू होते. यश-शलाका मधे-मधे दिल्लीला जाऊन येत होते. काम-धंदे सोडून किती दिवस बसणार?

मधल्या काळात 'पेनकीलर' बदलल्या. जुन्या गोळ्या काम करत नव्हत्या. नव्या काम करतील याची खात्री नव्हती. मरण निश्चितपणे येणार होतं. तोपर्यंतचा काळ जास्तीतजास्त सुसह्य व्हावा इतकेच प्रयत्न चालू होते. शेवटी 'पेनकीलर' गोळ्यांनीही हात टेकले. आता झोपेची इंजेक्शनं देऊन झोपवून ठेवायचं इतकंच. मग अशा रुग्णाची काळजी घेणाऱ्या कुठल्याशा संस्थेत अमरला ठेवायचा निर्णय अनिताने घेतला. कारण आता अमरला चोवीस तास डॉक्टर-नर्सची निकड भासणार होती. आणि असं केल्याने यश-शलाकाही आपापली नोकरी संभाळू शकणार होते. शक्य असतं तर अनिताही गेली असती. तुंबलेली कामे तिची वाट पाहात होती. पण अशा परिस्थितीत जाणार तरी कशी अमरला सोडून? कधी तिच्या मनात विचार यायचे, अमर- आपला सहचर- आपला सुख-दु:खाचा साथी- मग तो शेवटचे श्वास मोजत असताना त्याला सोडून नोकरीच्या मागे धावण्याचे विचार आपल्या मनात येतातच कसे? पण मानवीमनाची गुंतागुंत कोणाला समजलीय? उद्या अमर गेल्यानंतर रोज त्याच्या आठवणीत झुरून, दु:खी होऊन अनिता जगणार आहे. पण आज तो जिवंत असताना त्याला सोडून ऑफिसला कसं जाता येईल, हा विचार करतेय अनिता. त्याचा उरला-सुरला सहवास तिला हवाहवासा वाटत नाही? की हसता- बोलता असेल तोच सहवास? पण एखादं आवडतं चित्र नाही का आपण फ्रेम करून भिंतीला लावत? जाता-येता ते चित्र नाही का आपण डोळे भरून पाहत? उद्या अमर गेल्यानंतर त्याचा फोटो भिंतीला लावून त्याच्याशी ती जाता-येता बोलेल. फोटोशी बोलणं खरंच फार छान आणि सोपं. प्रतिक्रिया नसतात त्यात किंवा असल्या तरी बोलणाऱ्याला हव्या असतील अशाच असतात. सेवा, शुश्रुषा, भांडणं, वाद या सर्वांहून उच्च प्रतीचं असतं फोटोशी बोलणं.

ताणून-ताणून धरलेला, लांबावलेला श्वास अखेर अमरने सोडला, तेव्हा संबंधित सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असेल. आता हे शेवटचंच बारा-तेरा दिवसांचं रखडणं. मग यश-शलाका-शेफाली सुखाने (म्हणजे दु:ख मागे ठेवून) दिल्लीला जातील. अनिता तिच्या नोकरीला. वसुधाच्या प्रवासाच्या दगदगीला पूर्णविराम मिळेल. शिवाय अमरने जाण्यासाठीही सुट्टीचा दिवस निवडला. बारावं-तेरावं येतंय तेही शनिवारी-रविवारी. दोन्ही वेळी कोणाला सुट्टी घेऊन यावं लागलं नाही. वसुधाची कसलीशी कार्यशाळा ठरली होती. चार दिवसांची. त्याच चार दिवसात अमरचं काही झालं असतं तर कार्यशाळा बुडणार होती. पण कार्यशाळा सुरू व्हायच्या आधीच अमरने सगळं संपवलं. तिच्या लाडक्या भावाने जातानाही सर्वांची सोय पाहिली जणू.

...उदास होऊन वसुधा खिडकीपाशी उभी आहे. तेवढ्यात कशाने न कळे, एक कावळा रस्त्यावर मरून पडला. क्षणात- अक्षरशः क्षणात असंख्य कावळे आजुबाजूच्या घरांवर, झाडांवर, तारांवर जमले. काव-काव-काव-कावने आसमंत भरला. कोणी काही खाद्यपदार्थ टाकल्यावर जमतात त्याच्या कितीतरी पटीनी कावळे जमले. आपल्या मित्राला, सहचराला, नातलगाला, ज्ञातीबांधवाला अंतिम निरोप द्यायला. माणसापेक्षा कावळाच अधिक माणुसकी असलेला म्हणायचा. उगीच नाही माणसाच्या बाराव्या-तेराव्याला माणूस कावळ्याची आठवण ठेवत!

*

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे



# युवामंच

## मी हे वाचले. तुम्ही?

## पारसी

**-सरोज कोठारे**

आपल्या सनातन वैदिक हिंदू आणि झरतुष्ट्रीय धर्माच्या अनेक मूळ कल्पनांमध्ये धार्मिक विधींमध्ये आणि चालीरितींमध्ये कमालीचे साम्य आहे, हे तुम्हाला माहित आहे का? पारसी लोक भारतात अनेक शतके राहत असल्याने त्यांच्या आणि आपल्या धर्मात काही साम्य स्थळं असणे साहजिकच नाही का! पण पारसी इकडे येण्यापूर्वीपासूनची आहेत. उदाहरणार्थ, हिंदूंमध्ये म्हणजे आपल्यात सूर्याला फार महत्त्व आहे. सूर्य ज्ञान, विश्वरचनेतील शिस्त राखणारा आणि सत्याचा प्रतिक मानला जातो. नेमक्या याच गोष्टीचा तो धाता आहे, असे झोराष्ट्रीय म्हणजे पारसी लोक समजतात. त्याचं पृथ्वीवरील रूप म्हणजे अग्नी. सर्व धार्मिक समारंभामध्ये अग्नीची उपस्थिती आवश्यक असते. झोराष्ट्रीय धर्माचे सार सांगणाऱ्या मूळ सतरा श्लोकांमध्ये ग्रंथित केलेले याला अर्थागाथा असे संस्कृत नाव आहे. गाथा हा शब्द आपल्या बऱ्याच भाषांमध्ये प्रचलित आहे. आपल्या मराठी भाषेमधील एका महान संताची काव्यरचना गाथा म्हणूनच ओळखली जाते. अर्थातच तुकाराम (तुकोबाराय). झोराष्ट्रीय गाथेमध्ये आणि हिंदूंच्या वेदांमध्ये फार साम्य आहे. त्यांच्या आवेस्ता म्हणजे वेगळ्या उच्चारांतला सूर्य हा प्राणिमात्राचा उगम आणि पृथ्वीच्या चिरंजीवित्वाचा मूळ स्त्रोत आहे. तो आपल्याला वाट दाखवतो असे पारसी लोक आपल्याप्रमाणे मानतात... कारण आपणही हिंदू लोक सूर्याची प्रार्थना असलेल्या गायत्री मंत्राला वेगळे स्थान देतो. नेमका मंत्र हाच शब्द झोराष्ट्र वापरतात. गायत्री मंत्रामध्ये गाईचा काही संबंध नाही. गायत्री हा एक छंद आहे, त्यात मंत्राची रचना केलेली आहे. पण गो किंवा गौरा म्हणतात. संस्कृतमध्ये तिच्या दुधाला दुग्ध तर पारशियन दुग्धोवा म्हणतात. झर तुष्टाची आई दुग्धोवा नावाची गौळण होती. तिच्यावरून हा शब्द प्रचलित झाला.

आपल्या इथे गाईला समृद्धी मानतो तर पारसी गरीब जीवाचे रुपक समजतात. आता ऋषी हा शब्द बघा. आपण ज्ञानी पुरुष म्हणजे ऋषी असे म्हणतो. पण झरतुष्ठ स्वत:ला रेषी म्हणजे वैदिक ऋषी म्हणवून घेत अरबी आक्रमणानंतर ज्यानी धर्मबदल नाकारला त्यांच्यावर झिझिया कर बसविण्यात आला. तो सक्तीचा कर आपल्याला माहीत आहे. जो औरंगझेबाच्या राजवटीत हिंदुंना भरावा लागत असे. तेव्हा झोराष्ट्रीयांनी देशांतर केले. आपल्या आर्यवंशाच्या शाखेकडे जावे म्हणून ते जहाजातून भारतात आले. त्यात एक जहाज बुडाले. पण बाकी जहाजे गुजरातच्या किनाऱ्याला लागली. गुजरातच्या राजाकडे त्यांनी आश्रय मागितला त्यावेळी राजा त्यांना म्हणाला, ''माझ्या राज्यात आधीच फार गर्दी आहे. मी तुम्हाला कसा ठेवून घेऊ?'' झोराष्ट्रीयचा प्रमुख फार हुषार आणि चतुर होता. त्याने गरम दुधाचा काठोकाठ भरलेला पेला आणि थोडी साखर मागवली. त्याने दुधाचा एक थेंबही खाली न सांडता ती साखर त्यात विरघळवली आणि म्हणाला, ''महाराज, या साखरेसारखे आम्ही तुमच्या प्रजेमध्ये मिसळून जाऊ. तुमच्या राज्याची गोडी वाढवू.'' तेव्हा खुष होऊन राजाने त्यांना राहायला जागा दिली. पण दोन अटी घातल्या- तुम्ही आमचा पोशाख घातला पाहिजे, आमची गुजराती भाषा बोलली पाहिजे. पण राजाने त्यांच्यावर हिंदू धर्माची कधीच सक्ती केली नाही. त्यांचा मूळ धर्म चालूच राहिला. त्यांच्या अग्यारित झोराष्ट्रीय धर्माची तीन तत्त्वे- हुमाता, टूकता, हुवस्ती. सुविचार, सुवचन आणि सदाचार गुजराती लिपीत आढळतात. त्यांच्या धर्मस्थळी त्यांच्या धर्मात लिहिण्याचा मान एका भारतीय भाषेला मिळाला तो केवळ त्या भाषिकांनी गुजरातच्या राजाच्या दारी आलेल्या अनाथ आभाग्यांना दाखवलेल्या निष्काम सौजन्यामुळे. आपल्या इथे पारसी अग्यारीवर एक पंख असलेला माणूस असतो त्याला फर्नहार म्हणतात. त्यांच्या घरावर तो असतोच. पंखावरच्या तीन तत्त्वाला तो पावतो. पंखावर बसून उंच उंच जाईल. शेपटीवर कुविचार आणि कुकर्म आहेत ते तुम्हाला खाली खाली घेऊन जातात. त्यांचा उजवा हात देवाकडे उंचावलेला आहे आणि डाव्या हातात अंगठी आहे. तो नवरा-बायकोमधल्या मैत्रीचे प्रतिक आहे. हा पारसी समाज आपल्या भारतात थोडा असला तरी खूप अग्रेसर आहे. प्रसिद्ध आहे. यशस्वीही आहे. आपापला उद्योग करत ते जुन्या मूल्यांना चिकटून असतात. कांगावखोर नाहीत, शांत आहेत. त्यांच्यात धर्मप्रसार नाही. ते आपल्या जातीबाहेर लग्न करत नाहीत. मला मात्र त्यांच्या म्हणजे पारशांच्या लग्नाला जायला खूप आवडते. त्यांच्या लग्नातले जेवण खूप छान असते. धानसाक, पात्रमा मच्छी आणि खूप काय काय असते...

हां, असे साहेबजी हं.

*

**पुस्तक परीक्षण**

## The Accidental Prime Minister

**-सुजन राणे**

"The book titled The Accidental Prime Minister written by Mr. Sanjay Baru a former Officer in Dr. Manmohan Singh's Office and published by Penguines, deserves impartial reading in view of the current General Elections. At the outset I would like to clarify that Dr. Singh used to call himself the Accidental Prime Minster, perhaps in situations which were beyond his control. Consequently the title of the book is not one of Mr. Baru's making. The book is of great value to the lay reader who may like to know how the poilitics in New Delhi functions. Mr. Baru has considerable respect for Dr.Singh for his integrity, his scholarly mind and his national interests at heart. The reader certainly gets this impression when he reads chapter after chapter, as Mr. Baru has not spoken disparagingly about Dr. Singh anywhere. However he is at great pains to ascertain on so many pages that there are two power positions in New Delhi --- the PM and the leader of the party in power. Regrettably the PM's postion is relegated by the leader of the party in power, very often to the point of humiliation before the Press and other media. Mr. Baru has particularly brought out this unfortunate development from time to time in both the terms of Dr.Singh, particularly in his second one. According to him, Sonia Gandhi often bypassed Dr.Singh with regard to appointments of Ministers and other vital decisions of national significance. Probabaly this prompted Dr.Singh to call himself the Accidental Prime Minister, may be in view of the fact that he was not elected to the Lok Sabha and was appointed through the Rajya Sabha, though Mr. Baru advsied him on various occasions to seek a place in the Lok Sabha through election, as this would have strengthened his hands. The book says that Dr. Singh was often at the mercy of politicians like Karat, Pranab Mukerjee, Anthony and L.K. Adavani, who were instrumental in influencing Mrs. Gandhi's decisions. However Dr. Singh put his foot down at the time of India's nuclear agreement with USA and finally got it signed.though Mr. Karat tried his level best to sabotage it. At the end of the book, one strongly feels that Dr. Singh sacriced his own importance as Prime MInister for the betterment of the country, though his silence has been misinterpreted as his weakness, particularly when he was faced with corruption charges against his Ministers.

With regard to Mr. Baru's background, he comes from a well-educated and distiguished family.His father was a speech-writer for Mr.Narasinhan Rao the former Prime Minister. He has made his mark as PM's media person and as a known journalist in the world of Press in India. He relinquished his position in PM's Office in 2009 and took up appointment as a Professor in Singapore. To his credit he was recalled by Dr. Singh in his second term, but some unscrupulous politicians in New Delhi ensured that he was not appointed. The opinion expressed in this article is entirely mine as a Non-Resident Indian living in USA, but someone who is proud of his Indian roots. "

Email: sujanrane@yahoo.com

*

## 'काव्यपंचक'बद्दल प्रतिक्रिया

**-नंदकुमार कृ. विजयकर**

'कविता' हा माझा प्रांत नव्हे. कविता मला समजत नाही आणि कविता मला जमतही नाही, असे बरेचजण म्हणतात. आता, आतापर्यंत माझंही असंच मत होतं. पण खरं सांगू का; कविता ही समजायची बाब नसून ती उत्स्फूर्तपणे सुचायला हवी. आणि असा हा काव्य आविष्कार वाचण्याचा योग परवाच आला. सुहासिनी कीर्तिकर मॅडमनी 'काव्यपंचक' या त्यांच्या आणि त्यांच्या सहाध्यायी मैत्रिणींच्या कवितांचा संग्रह माझ्या हाती ठेवला तेव्हा बऱ्याच दिवसांनी एवढ्या साऱ्या कवितांना मी सामोरा गेलो. आज मी सुहासिनीबाईंच्या कवितेवर थोडं बोलण्याचं धाडस करणार आहे. अर्थात हे काही त्यांच्या कवितेचं रसग्रहण किंवा परीक्षण नव्हे; तर त्या कविता वाचून माझ्या मनात जे विचार आले ते थोडक्यात मांडण्याचा माझा प्रयत्न आहे.

श्रीराम शिधये यांनी आपल्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे स्त्रिया जरी बाहेर काम करीत असल्या तरी

**(पान ६ कॉलम ४ वर)**

लेखांक-५

# केल्याने देशाटन

**— हेमलता केशव कोठारे**

२५ डिसेंबर २००७ आणि ३१ डिसेंबर २००९ला मी सिडनीत होते.त्यामुळे २५ व ३१ डिसेंबरच्या फायर वर्क सोहळ्याची मी साक्षीदार होऊ शकले. तिथले खास वैशिष्ट्य म्हणजे सिडनी कौन्सिल (आपली जशी म्युनिसिपल कॉर्पोरेशन) डार्लिंग हार्बरवर रात्रौ बारा वाजता तसेच शहरातील ठिकठिकाणच्या मोठ्या पार्कमध्ये रात्री नऊ वाजता फायर वर्क दाखविते. हे नऊ वाजता का? तर मुले रात्री बारा वाजता झोपलेली असतात. माझा नातू लहान असल्याने मी नऊचाच कार्यक्रम पाहिला. प्रचंड संख्येने लहानथोर येतात. डार्लिंग हार्बरवर तर सकाळपासूनच लोकांची गर्दी होते. सर्व दिवसभर मग ही माणसे मजा करतात. रात्री अप्रतिम दारूकाम दाखविले जाते. त्यात ऑस्ट्रेलियाच्या डार्लिंग हार्बरवरील फायर वर्कचा समावेश असतो. पार्कमधील फायर वर्कही अप्रतिम असते. संध्याकाळी ६।।-७ वाजता खाण्यापिण्याच्या तजविजीने, फोल्डिंग खुर्च्या आणि चटया बरोबर घेऊन सर्वजण मोठ्या उत्साहाने पार्कमध्ये जमतात. विविध खेळ, खाद्यपदार्थ यांची दुकाने लागलेली असतात. मला तर ती आपल्याकडील मोठी जत्राच वाटली. माणसे, भाषा, संस्कृती भिन्न असली म्हणून काय झालं? शेवटी सर्व माणसांची प्रवृत्ती एकच- सर्वांना हवा असतो आनंद! त्याच्या परी फक्त वेगळ्या. २५ डिसेंबर ते १ जानेवारी म्हणजे या लोकांचा नाताळ. त्यासाठी दोन आठवडे आधीपासूनच दुकाने झगमगून उठतात आणि खरेदीला सुरुवात होते. नाताळच्या शुभेच्छा सर्वच सर्वांना देतात. माझी मुलगी (सिडनीला), मुलगा (टोरोंटोला) याला अपवाद नाहीत. त्यांचे शेजारी घरी भेटी देण्यास येतात. परधर्म म्हणून आनंदात भेदाभेद नाही. असे वाचनात आले आहे की, आपल्या आषाढी वारीला पाश्चिमात्य लोक पंढरीला येतात. सहभागी होतात. काहींनी त्यावर प्रबंध लिहून फिल्मसुद्धा तयार केली आहे. आपल्या महाराष्ट्रात राहून मी तरी अजून कधी वारीचा अनुभव घेतलेला नाही. पंढरीचा विठोबा 'लावण्यसोहळा' म्हणून पाहिलेला नाही. म्हणजे आनंद हा धर्म, व्यक्ती यावर अवलंबून नसतोच. कोणाला कशात आनंद मिळेल सांगता येत नाही. सर्वच पाश्चात्य देशांमध्ये मोठमोठे पार्कस् आहेत. एकतर त्यांचेकडे जमीन जास्त, लोकसंख्या कमी. आपल्याकडे उलट! खंत वाटते की मुंबईतील मुलांना खेळायला मैदाने नाहीत, पार्कस् नाहीत.जे होते ते आरक्षण काढून टॉवर्समय झाले! काय म्हणायचे याला? असो.

सिडनीत मोठमोठी बरीच गोल्फ मैदाने आहेत. विशाल हिरवट निळ्या रंगाचा समुद्र किनारा आहे. किनाऱ्यालगत चालण्यासाठी, सायकलिंगसाठी मोठमोठे रस्ते आहेत. म्हातारे आजोबाआजीसुद्धा सायकलिंग करताना दिसतात. आपल्याकडे हे नाहीच. क्रिकेटची तर बरीच मैदाने आहेत,क्लब्ज आहेत. २००० साली सिडनीत ऑलिंपिक झाले; तेव्हा प्रचंड मोठे नवीन स्टेडियम बांधण्यात आले. ऑलिंपिक पार्क म्हणून सिडनीत एक भाग आहे. तेथे जवळजवळ बारा ते तेरा स्टेडियम्स आहेत. ती मी बाहेरून बघितली. ऑलिंपिकच्या-वेळी ऑलिंपिक पार्क विमानतळाला जोडण्यासाठी नवीन रेल्वे टाकण्यात आली. 'पार्क रेल्वे' हे तिचे नाव. खेळ, खेळाडू ही तर त्यांची राष्ट्रीय संपत्ती. दरवर्षी सिडनी सरकार खेळाडूंवर लाखो डॉलर्स खर्च करते. त्यांचा खुराक, वैद्यकीय तपासणी, सुविधा याकडे कटाक्षाने लक्ष पुरविले जाते. आपल्याकडे मात्र सगळीच वानवा! चीनमध्ये चार पाच वर्षांच्या मुलामुलींना खेळाचे प्रशिक्षण सुरू होते तेव्हापासूनच आहार, सराव यावर लक्ष ठेवले जाते. वैद्यकीय तपासणी असते. म्हणूनच तर चिनी खेळाडू ऑलिंपिकवर आपली मुद्रा उमटवतात. सिडनीला समुद्रकिनाऱ्यामुळे बोटिंग आणि स्वीमिंग हा इथल्या लोकांचा आवडता छंद. एक गंमतीदार गोष्ट म्हणजे घराघरासमोर जशा कार्स उभ्या असतात तशाच बऱ्याच ठिकाणी स्वत:च्या मालकीच्या बोटीही उभ्या केलेल्या असतात. बोटिंग आणि फिशिंग ही त्यांची आवडती गोष्ट. उन्हाळ्यात तापमान अगदी चाळीस-पंचेचाळीसपर्यंत जाते. त्यामुळे बरेचदा शहरात, गावात, जंगलात मोठमोठे वणवे (बुशफायर) लागतात. ते विझवणे कठीण जाते. तापमान असे वाढले की अगदी उन्हाळ्यातल्या संध्याकाळी किंवा रात्री हटकून धो-धो पाऊस कोसळतो. जसा सध्या महाराष्ट्रात कोसळतो आहे. असा पाऊस नंतर गारठा घेऊन येतो तिथं. अगदी स्वेटर चढवावा लागतो अंगात. एकूणच हवामान असे बेभरवशाचे.

सिडनीत बरेच भारतीय आणि श्रीलंकन लोक आहेत. चायनीज लोकांच्या चार पिढ्या येथेच वसल्यात. त्यामुळे बरीच सुंदर देवळे, बौद्ध देवालये आहेत. इस्लामिक, ग्रीक, इटालियन, ब्रिटिश लोकांचाही भरणा आहे. त्यामुळे मशिदी, भव्य व उत्तम स्थापत्य असलेली प्राचीन चर्चेस जागोजागी आहेत. ऑस्ट्रेलियन वेगवेगळ्या धर्मातील देवालये बांधण्यासाठी सरकार त्यांना विनामूल्य जमीन देते. हा सरकारचा 'सर्वधर्मसमभाव' कौतुकास्पदच. इथे येण्यापूर्वी माझा समज असा होता की ख्रिश्चन धर्म म्हणजे फक्त कॅथोलिक आणि प्रोस्टेटंट. पण इथे तर ग्रीक, इटालियन आणि इतर लोक यांची सवतासुभा असलेली चर्चेस आहेत. ग्रीक माणूस इटालियन चर्चमध्ये जात नाही. असं आहे सगळं! उगाच खोलात कशाला शिरा? मात्र स्थापत्यदृष्ट्या ही चर्चेस अप्रतिमच. दगडी बांधणी. भव्य कमानी. उंच छत. छतावर उत्तम पेंटिंग्ज. लांबरुंद उंच खिडक्या, भव्य लाकडी दरवाजे. त्यावरील अप्रतिम कोरीव काम. खिडक्यादारांवर उत्तम चित्रे. काचेची झुंबरे... अगदी डोळे दिपून जातात. अन् हो! चारशे पाचशे वर्षांपूर्वीची ही चर्चेस अजूनही सुस्थितीत आहेत. कारण 'जुने ते सोने' जतन करण्याची त्यांची वृत्ती. आपल्या भारतात उत्तम वास्तू नाहीत का? पण 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' म्हणत त्यांची योग्य निगराणी केली जात नाही. नवीन इमारतीमध्ये फक्त जास्तीत जास्त लाभच पाहिला जातो. जाऊ द्या! माझा हा विषय नव्हे!

सिडनीनंतर मी बघितलेले दुसरे शहर म्हणजे 'कॅनबेरा'.

*

# कल्पवृक्ष कन्येसाठी...

**डॉ. वैजयंती अजिंक्य**

एकवीस वर्षांपूर्वी माझ्या सासऱ्यांना, बाबांना पहिला हार्टअटॅक आला. आम्ही त्यांना वाचवू शकलो नाही. परंतु इतक्या वर्षांनी माझ्या मनात त्यांचं स्थान अबाधित आहे. बाबांची आठवण आली की, 'कल्पवृक्ष कन्येसाठी लावुनिया बाबा गेला' या गाण्यात ज्या भावना आहेत, त्याच मनात दाटतात. खरंतर ते माझे सासरे पण मला वडिलांप्रमाणेच होते. आंतरजातीय विवाहामध्ये बाबांचे आशीर्वाद मोलाचे ठरले होते. माझं लग्न झालं तेव्हा बाबा म्हणजे डॉ. शरदचंद्र अजिंक्य, बॉम्बे व्हेटर्नरी कॉलेजमध्ये डीन म्हणून काम करत होते. ते सतत रिसर्चमध्ये बुडालेले असत. तरीही घरी आले की माझ्या दोन लहान मुलांना गोष्टी सांगणं, त्यांच्याशी खेळणं, त्यांना निरनिराळे प्राणी दाखवणं अशा गोष्टी आनंदानं करीत. पण सर्वात चांगली गोष्ट त्यांनी मला दिली ती त्यांची तत्त्वं! प्रत्येक परंपरा शास्त्रीय दृष्टीकोनातून तपासून पाहायची समज. उदाहरणार्थ, वटपौर्णिमेला पूजा म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीला स्त्रियांनी झाडे लावावीत व जगवावी आणि वृक्षाचा मान राखावा, असा हेतू होता. तसेच सोवळ्याने जेवण करण्यात पूर्णत: शास्त्रीय हेतू असा की स्वयंपाक करताना त्यात जंतूंचा संसर्ग होऊ नये. आमचे बाबा म्हणजे, 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' याचं चालतं बोलतं उदाहरण होतं. त्यांचं वाचन चौफेर असे. नवीन गोष्टी शिकणं व शिकवणं या दोन्ही गोष्टी ते अत्यंत प्रेमाने करत असत. ३५ वर्षांपूर्वी 'गोम्बोरो' नावाच्या रोगाने लाखो कोंबड्या मरत होत्या, तेव्हा बाबांनी त्यावर संशोधन करून कार्यक्षम लसही बनवली. तसेच म्हशीपासून स्वस्त इन्शुलिन मिळविण्यासाठी सोपी पद्धत शोधून काढली होती. याबद्दल त्यांना अनेक बक्षिसेही मिळाली. भारत सरकारकडून त्यांना 'हरि ओम' पुरस्कार मिळाला होता. आमच्या बाबांकडे सगळ्या प्रकारची उत्तरं मिळायची. फक्त शास्त्रीयच नव्हे तर वैयक्तिक अडचणी, नात्यातले प्रश्न याविषयी बाबा आम्हाला मार्गदर्शन करायचे. फक्त आम्हीच नव्हे आमचे मित्र-मैत्रिणी, नातेवाईक सगळेच बाबांकडे आपले प्रश्न घेऊन येत आणि उत्तरे मिळाल्याच्या समाधानानेच घरी जात. आजही एखाद्या गोष्टीची चर्चा करताना, एखाद्या समस्येतून उपाय शोधताना आम्ही बाबांची आठवण करतो. बाबा असते तर त्यांनी काय बरं सांगितलं असतं? असा विचार करून पुढे जातो. निर्णय घेतो. त्यातून चांगला मार्ग निघतोच. बाबा इतक्या तडकाफडकी गेले की त्यांचं ऋण व्यक्त करण्याचीही संधी मिळाली नाही. आज मला महाराष्ट्र टाइम्सच्या माध्यमातून बाबांना 'थँक यू' म्हणायचे आहे. बाबा, तुम्ही आम्हाला संस्काराची आयुष्यभर पुरणारी शिदोरी दिलीत.

('महाराष्ट्र टाइम्स'मधून साभार)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणगी

✳ श्रीमती रोहिणी चित्रसेन जयकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनाप्रीत्यर्थ (निधन- १०-४-२००४ रोजी) त्यांच्या कन्या पूनम सी. आगासकर आणि विद्युल्लता सी. जयकर, तसेच नातू सत्री सी. आगासकर यांजकडून रु. १,०००/-

✳ नातू ध्वनितच्या व्रतबंधनाप्रीत्यर्थ आजी सौ. ज्योत्स्ना आणि आजोबा श्री. रामकृष्ण तळपदे यांजकडून रु. ५०१/-

✳ श्रीमती आशा विश्वास जयकर यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

संस्थेचा वार्षिक अहवाल आणि आर्थिक हिशोबाचे तक्ते असणारे ८० पानी देखणे पुस्तक नेहमीप्रमाणे एप्रिलमध्येच ज्ञातीयांच्या हाती आले. उचित मुखपृष्ठ आणि चोख अर्थव्यवहारांचा तक्ता, ज्ञातीतील दिवंगत सदस्यांची नोंद, प्रासंगिक निवेदन आदींमुळे हे पुस्तक संग्रहणीय असेच. 'वाटावा अभिमान अशी ही' ज्ञातीसंस्था. अभिनंदन.

## अभिनंदन

✳ यावर्षीपासून मराठी भाषा परिषद, पुणेतर्फे 'सत्त्वशीला सामंत मेमोरियल लेक्चर' सुरू करण्यात आले. पहिल्याच भाषणाचा सन्मान डॉ. सत्त्वशीला यांची मैत्रीण असणाऱ्या मृदुला प्रभुराम जोशी यांना लाभला. 'संहिता संपादन: स्वरूप आणि पथ्ये' या विषयावर त्यांचे व्याख्यान झाले. या व्याख्यानावर आधारित त्यांचा याच विषयावरील लेख 'भाषा आणि जीवन' नियतकालिकात घेण्यात आला. अभिनंदन.

✳ टी.व्ही.वरील मालिकांमध्ये श्रेयस तळपदे, महेश कोठारे ही नावे माहिर आहेत. आता नव्याने या 'मातीतील साहसाचे' सूत्रसंचालन श्रेयस तळपदे करणार आहेत आणि 'झी' मराठीवर महेश कोठारे यांची 'जय मल्हार' मालिका येत आहे. झी गौरव पुरस्कार समारंभात महेश कोठारे यांचे सुपुत्र श्री. आदिनाथ आणि स्नुषा उर्मिला कानिटकर यांनी नृत्य सादर केले. आदिनाथचा 'हॅलो नंदन' चित्रपटही गाजत आहे. या सर्वांच्या कर्तृत्वाचा भंडार असाच उधळत राहो. अभिनंदन.

✳ डॉ. ज्ञानेश्वरी तळपदे यांच्या शोधनिबंधाचा 'सिद्धीविनायक- अनन्य साधारण ऊर्जा' या पुस्तकात समावेश आहे. अभिनंदन.

✳ अमेरिकेतील पहिला होमियोपाथीचा ऐतिहासिक सेमिनार ७ ते ९ मार्च रोजी डॉ. प्रफुल्ल गजानन विजयकर आणि डॉ. अंबरीश प्रफुल्ल विजयकर यांनी यशस्वीपणे घेतला. अभिनंदन.

✳ २५ मार्चला हेल्थ मिनिस्ट्री ऑफ थायलंडतर्फे बँकॉक येथे होमियोपाथी सेमिनार झाला. त्यात डॉ. अंबरीश प्रफुल्ल विजयकर आणि डॉ. तन्मय प्रदीप विजयकर यांचा सहभाग होता. अभिनंदन.

## परीक्षेतील सुयश

**एम्.एस्. सीआयटी (महाराष्ट्र शासन)**

कु. शिवानी सुनील नवलकर

(शत प्रतिशत गुण) अभिनंदन

# प्रभुतरुणाची डायरी

## जनन

२५-०४-१४ सौ. मानसी आणि श्री. नीलेश प्रदीप मानकर पुत्र धसवाडी (गिरगाव)

## कुर्यात् बटोर्मंगलम्!

०४-०५-१४ शौर्य गुंजारव विहंग नायक
०४-०५-१४ ध्वनित मिनेश तळपदे
११-०५-१४ अरमान अक्षय कोठारे

## नारळ साखर दिला

३१-०३-१४ डॉ. तन्मय प्रदीप विजयकर, कु. नेहा चौधरी (आं. ज्ञा.)

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १०-४-१४ | श्रीमती सरोज जयवंत प्रधान | वय, ७९ | खार |
| १३-०४-१४ | श्रीमती नेत्रा अरूण कोठारे | वय, ६२ | मालाड |
| १३-४-१४ | सौ. नयना शशिकांत धराधर | वय ७८, | झावबावाडी. गिरगाव |
| १४-४-१४ | श्री. अरविंद रामराव मानकर | वय ७६ | नवीवाडी, गिरगाव |
| २१-४-१४ | श्रीमती सुलभा रामराव तळपदे | वय ७५ | माटुंगा |
| २५-४-१४ | श्री. किशोर कृष्णराव कोठारे | वय ७४ | भाईंदर |
| २८-०४-१४ | श्री. विनोद भोलानाथ जयकर | वय ७९ | अंधेरी |
| ०१-०५-१४ | सौ. सुरेखा अरविंद धैर्यवान | | विलेपार्ले |
| ०५-०५-१४ | श्रीमती निर्मला (सरोजिनी) विश्वनाथ राव | वय ९४ | ठाणे |

(पान ४ कॉलम ४ वरून)

घरकाम काही चुकत नाही. घरातील सर्व नातेसंबंध संभाळून त्यांना पुढे जायचं असते. प्रसंगी मनात भावनांचा कल्लोळ उठतो आणि याची परिणती म्हणजे या सहज सुचलेल्या कविता. वैयक्तिक आयुष्यात घडणाऱ्या घटनांचं प्रतिबिंब काही प्रमाणात सुहासिनीबाईंच्या 'तारण', 'आसवाचे दव', 'लांडगेतोड', 'अजून' या कवितेत पाहायला मिळते. 'सगळे कसे छाऽऽन' या कवितेचा खास उल्लेख करावासा वाटतो. आपण सर्वजण तात्कालिन सामाजिक, राजकीय घडामोडींवर तावातावाने बोलतो, चर्चा करतो. पण सुहासिनीबाईंनी 'आणीबाणी'च्या परिस्थितीवर भाष्य या कवितेतून मोठ्या परिणामकारक मांडलं आहे. त्यांच्या काही कविता चारोळीवजा अशा संक्षिप्त आहेत. किंवा एखाद्या गझलमध्ये येणाऱ्या शेराप्रमाणे आहेत. गझलमधील दोन ओळीचा शेर म्हणजे एक संपूर्ण कविताच असते. आता पाहा:-

('तारण')
त्याचे जाणे जर होते मरण
माझे जिणे तर मग काय?
ठेवी जीव माझा असा तारण
लेकीसाठी रोवावा लागे पाय!
किंवा
('आभास')
आता फक्त पोरींपुरता श्वास
एरवी काय; जगण्याचा आभास

'चरणे' या कवितेत एका सासुरवाशिणीचे भावविश्व फार सुंदररित्या आपल्यापुढे येते. बांधाच्या पलिकडे, दूर असलेले 'शिवार' असे तिचे माहेर, तिथला आनंद आठवून ती हळवी होते. 'मेरेवरून दुरून दुरून मीही चरते आनंद अनिवार'. 'गाज' मध्ये समुद्राची गाज मनातल्या गाजेला साद देत आहे. कशी? 'आतली... आतली'. हळुहळू ती विरून जाते. मला सर्वात आवडलेली कविता म्हणजे 'बाईपण'. जगण्याचे सुरकतलेपण चघळत राहायचे असते आणि मनातील कठीण बी फेकून द्यायची असते. असो. मला उलगडलेले काव्यभाव मी वाचकांपुढे उघड करून माझे मतप्रदर्शन थांबवतो.

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**

मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-

**श्री. मंगू ताशेवाला**

मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर), बिल्डिंग नं. ६७/६९, कामाठीपुरा ७वी गल्ली, एम. आर. रोड, मुंबई-४०००08

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67